**<u>रे.मु.नं.५१/२०१७ मधील नि.०५ वर आदेश</u>**
रमेश वाळकू मसणे व १ वि.पंढरीनाथ बेंडू मसणे व इतर

१. प्रस्तूतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी प्रतिवादी क्र.१ ते ६ विरूध्द दाखल केला आहे.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** :-

२. मौजे आंबोट, ता.कर्जत येथील परडी नं.५३ (जुना पर्डी नं.२१) त्यामध्ये असलेला गुरांचा गोठा ग्रुप ग्रामपंचायत पोटल क्र.११२ दावा मिळकत आहे. सदरची मिळकत वादींची वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची आहे व वादी क्र.२ चे नावे नोंद केलेली आहे. पर्डी नं.५३ ही श्री.गणपत लक्ष्मण मसणे यांचे नावे आहे. ते मयत झाले असून प्रतिवादी क्र.७ ते १२ त्यांचे कायदेशिर वारस आहेत.

३. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा दावा मिळकतीशी कोणताही हितसंबंध नसताना तसेच त्यांची मिळकत दावा मिळकती लगत नसताना ते वादीच्या दावा मिळकतीचे वहिवाटीस अडथळा करत आहेत. करिता वादींनी प्रस्तूतचा दावा दाखल करून दरम्यानचे काळात त्यांचे दावा मिळकतीचे वहिवाटीस हरकत करू नये म्हणून तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे दाव्याला कैफियत व या अर्जाला म्हणणे (नि.२३) खाली दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा दावा मिळकतीचे मालकीहक्काशी व कब्जेवहिवाटीशी कोणताही हितसंबंध नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. या व्यतिरीक्त इतर कथन त्यांना अमान्य आहे. प्रतिवादींचे म्हणण्यप्रमाणे पर्डी नं.५३ चे दक्षिण बाजूस प्रतिवादीचे एकत्र कुटुंबाची पर्डी नं. ५५ (जुना नं.२३) ही मिळकत वामन बळीराम मसणे यांचे नावे आहे. या

मिळकतीमध्ये वादींनी पूर्वीचे जुने पर्डी नं.५३ मधील ग्रुप ग्रामपंचायत पोटल, मौजे आंबोट येथील घर मिळकत क्र.११२ चा गैरफायदा घेवून अतिक्रमण करत असल्याने प्रतिवादींनी त्यास मज्जाव केलेला आहे. वादीने हा दावा प्रतिवादींना त्रास देण्याचे उद्‌देशाने दाखल केला असल्याने अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी मागणी केली.

७. वादी व प्रतिवादीं तर्फे वकिलांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला, कागदपत्रे पाहिली. खालील मुद्‌दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्यासमोर खालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादींनी प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे काय ? | होय. |
| २ | न्यायाचा झुकता तराजु वादींच्या बाजुने आहे काय ? | होय. |
| ३ | अर्ज नामंजुर केल्यास वादींना अपरिमित हानी होईल काय ? | होय. |
| ४ | आदेश काय ? | अर्ज मंजूर. |

## <u>कारणमिमांसा</u>

८. वादीं तर्फे याकामी विविध दस्तऐवज दाखल केले आहेत. प्रतिवादींतर्फे कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाहीत.

**<u>मुद्‌दा क्र.१ करिता</u> :-**

९. वादींचे म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत गणपत लक्ष्मण मसणे यांचे मृत्यू पश्चात प्रतिवादी क्र.७ ते १२ यांच्याकडे वारसाहक्काने आली आहे. तसेच त्यामधील घर क्र.११२ वादी क्र.२ चे नावे नोंद आहे. प्रतिवादींनी त्यांचे

म्हणण्यामध्ये पर्डी क्र.५३ मध्ये घर क्र.११२ असल्याचे नाकारले नाही. याउलट त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादींनी गणपत लक्ष्मण मसणे यांचे पर्डी क्र.५३ व ग्रामदेवी अमजाई ट्रस्ट यांचे मिळकतीत अतिक्रमण करून घर क्र.११२ चे बांधकाम केले आहे. म्हणजे सद्यपरिस्थितीत घर क्र.११२ पर्डी क्र.५३ मध्ये आहे.

१०. वादींनी नि.४/१ व २ खाली दावा मिळकतीचा ७/१२ दाखल केला आहे. त्यामध्ये पर्डी क्र.५३ (जुना क्र.२१) वर गणपत लक्ष्मण मसणे यांचे नावाची नोंद आहे. तसेच नि.४/४ खाली ग्रुप ग्रामपंचायत पोटल, मौजे आंबोट येथील घर क्र.११२ वादी क्र.२ चे नांवे नोंद असून त्यांनी या घराचा कर भरल्याची पावती नि.४/५ खाली दाखल केली आहे. त्यामुळे घर क्र.११२ वादी क्र.२ चे ताब्यात असल्याचे सद्यपरिस्थितीत दिसते.

११. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी म्हणण्यामध्ये दावा मिळकतीच्या मालकी वहिवाटीशी त्यांचा संबंध नसल्याचे मान्य केले आहे. परंतू त्यांचे म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचे दक्षिणेस त्यांची एकत्र कुटुंबाची पर्डी नं.५५ (जुना पर्डी क्र. २३) आहे. वादींनी नि.४/३ खाली दावा मिळकतीचा व लगतच्या मिळकतींचा नकाशा दाखल केला आहे. त्यामध्ये जुना पर्डी क्र.२१ लगत जुना पर्डी क्र.२३ आहे. परंतू नि.४/६ खाली पर्डी क्र.५५ वामन बळीराम मसणे व गुलाब मसणे यांचे नावे नोंद आहे. प्रतिवादींनी सदर दोन्ही साक्षीदारांचे शपथपत्र दाखल करून पर्डी क्र.५५ ही मिळकत प्रतिवादींचे एकत्र कटुंबाची आहे असे सांगितलेले नाही. तसेच पर्डी क्र.५५ वर प्रतिवादी क्र.१ ते ६ यांची नोंद नाही. त्यामुळे दावा मिळकतीलगत प्रतिवादी क्र.१ ते ६ यांची मिळकत असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे वादींनी घर क्र.११२ चे बांधकाम प्रतिवादीचे मिळकतीत अतिक्रमण करून केले आहे असे या टप्प्याला दिसून येत नाही.

१२. वादींनी नि.४/७ खाली प्रतिवादी क्र.१ व इतरांच्या नावाचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ चे ताब्यात स.नं. १५/१ हि

मिळकत आहे. नि.४/३ खालील नकाशावरून पर्डी क्र.२३ ला लागून स.नं. १५ असल्याचे दिसते. म्हणजे दावा मिळकती लगत स.नं.१५/१ हि मिळकत नाही. त्यामुळे वादी क्र.२ च्या बांधकामामुळे प्रतिवादींना नुकसान होण्याची परिस्थिती दिसत नाही.

१३. प्रतिवादींचे कथनाप्रमाणे वादींनी पर्डी क्र.५३ व ग्रामदेवी अमजाई ट्रस्ट या मिळकतीत अतिक्रमण करून बांधकाम केले आहे. प्रतिवादी क्र.७ ते १२ यांनी सदर बांधकामाला हरकत घेतली नाही. त्यांनी न्यायालयात हजर होवून वादीचे कथनाला आव्हान दिले नाही. तसेच ग्रामदेवी अमजाई ट्रस्ट यांनी देखिल कोणतीही हरकत उपस्थितीत केली नाही. प्रतिवादींनी त्यांचे कथनामध्ये ग्रामदेवी अमजाई ट्रस्ट कोणत्या मिळकतीत आहे याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे वादींनी घर क्र.११२ चे बांधकाम पर्डी क्र.५३ व ग्रामदेवी अमजाई ट्रस्ट या मिळकतीत अतिक्रमण करून केले असे दाखविणारा पुरावा या टप्प्याला उपलब्ध नाही.

१४. याउलट घर क्र.११२ हि मिळकत वादींचे कब्जेवहिवाटीत असल्याचे दिसून येत असल्याने वादीने प्रथमदर्शनी त्यांची केस शाबित केली आहे म्हणून मी मुद्दा क्र १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविते.

## मुद्दा क्र.२ व ३ करिता

१५. वादींचे म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ६ हे वादीचे दावा मिळकतीतील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. प्रतिवादींनी देखील त्यांचे म्हणण्यामध्ये त्यांनी वादीचे बांधकामाला मज्जाव केल्याचे सांगितले आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादी अतिक्रमण करून बांधकाम करत असल्याने त्यांनी मज्जाव केला.

१६. वादीने दाखल केलेल्या घर क्र.११२ चे असेसमेंट उतार-यावरून सदर घर पूर्णत्वास आले असून सध्या कोणतेही बांधकाम प्रलंबित असल्याचे दिसत नाही. सन २०१६-१७ साली वादीने या घराचा कर भरला आहे. त्यामुळे दावा दाखल करण्यापुर्वी पासून हे घर अस्थित्वात असल्याने व प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा त्याचेशी हितसंबंध नसल्याने त्यांना मज्जाव करण्यापासून रोखणे क्रमप्राप्त आहे. वादीने नि.४/९ खाली पोलिस ठाणे कर्जत यांनी दिलेले समजपत्र दाखल केलेले आहे. त्यावरून उभयपक्षकारांमध्ये यापुर्वी मतभेद झाल्याचे दिसते. अशा परिस्थितीत दावा मिळकतीचे वादीचे कब्जे वहिवाटीला संरक्षण देणे गरजेचे आहे अन्यथा प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचेकडून हरकत अडथळा उपस्थित झाल्यास वादींना अपरिमित नुकसान होवू शकते. करिता न्यायाचा तराजू वादीचे बाजूने असल्याने मी मुद्दा क.२ व ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालील आदेश पारीत करते.

:: **आदेश** ::

१. अर्ज मंजूर.

२. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी वादीला दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा दाव्याचे अंतिम निर्णयापर्यंत तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.

कर्जत (श्र.जि.डोलारे)
दि. २५.०१.२०१९ सह.दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
कर्जत-रायगड.

**<u>मुद्दे</u>**

१. दि.३१.०८.२०१८ रोजी ठराव क्र.१९७५ चे अनुशंगाने दि.२१.०९.२०१८ रोजी प्रतिवादींनी वादींना पाठविलेली नोटीस बेकायदेशिर आहे काय?

२. दि.०३.०९.२०१५ रोजीचा करार अस्तित्वात तसेच अंमलात असून प्रतिवादींवर बंधनकारक आहे का?

३. दि.२३.०१.२०१६ रोजी वादींचे जाहिरातींचे फलक तोडल्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान झाले आहे का ?

४. वादीने दाव्यास अपुरा मुद्रांक दिला आहे का?

५. वादी करार समाप्तीचे मुदत दि.०२.१२.२०१८ पासून पुढील १२ महिने कालावधीकरीता जाहीरातीचा ठेका वाढवून मिळणेस पात्र आहे का?

६. वादींची मागणी मान्य करण्यायोग्य आहे काय ?

कर्जत (श्र.जि.डोलारे)
दि. ०४.१२.२०१८ सह.दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
कर्जत-रायगड.